Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY


UGC Approved Multidiciplinary International E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

Vol (I)

12 January 2019 Special Issue – 68

# महिला सबलीकरणाच्या समस्या : आव्हाने आणि उपाय



Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Executive Editor of This Issue
Prof. A.R. Bhosle
Assist. Prof. Head of Dept. Sociology
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

Dr. S.K. Gaike
Assist. Prof. Dept. of Sociology
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

SWATIDHAN PUBLICATION

Visit to - www.researchjourney.net

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue -92 , महिला सबलीकरणच्या समस्या : आव्हाने आणि उपाय

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Empowerment Of Women – Through Domestic Violence Act. 2005 | Prof. Ingle Veena Manoj | 7 |
| 2. | Social and Domestic Violence:The Major Problem of Women Empowermentin India | Dr. Chandrashekhar I. Gitte | 10 |
| 3. | Study Of Superstitious Attitude And Mental Health Of EmployedAnganwadi Workers Homemakers | Prof. Shubhangi Satone | 15 |
| 4. | Gender Inequity and Brutality in Bama's *Sangati* | Mr. Gangadhar V. Shinde | 19 |
| 5. | Value System And Gandhian Thought | Dr.Vijay Tunte | 21 |
| 6. | Gender inequality and women | Dr Ranee Jagannathrao Jadhav | 25 |
| 7. | Mock-up of Feminine Vanquishing in Manujla Padmanabhan's*Lights Out* | Sarang Gajanan Haribhau | 29 |
| 8. | Pioneers of Feminist Movement. | Dr Mhamane Vijay Nagnath | 32 |
| 9. | Dimensions of women Empowerment in India | Thombre M. Dattatraya , Dr.D.S.Chavan | 34 |
| 10. | Domestic Violence in Dowery Death In India | Dr.N.B.Kadam | 36 |
| 11. | Dalit Feminist Perspective: Articulation of Unspoken Voices in Dalit Women Writings | Dr Rajpalsingh S. Chikhalikar | 39 |
| 12. | Women Empowerment : A Sociological Approach | Dr.kamble chandrakant | 41 |
| 13. | Man and Woman Relationship in Anita Desai's selected Novels | Dr. Bhagyashree S Gawate | 44 |
| 14. | Women's Safety in INDIA | Sawant S.G. | 47 |
| 15. | Women and Violence: Do they have legal Rights? | Dr. Raut Sunil Raosaheb | 49 |
| 16. | The Role of Education & literature in Women empowerment | Prof. Dr. H.R. Jawalge | 51 |
| 17. | Tourism: - A Vehicle For Promoting Gender Equality & Women Empowerment | Rupasi Das | 53 |
| 18. | Women and Globalization: An Overview | Dr. Milind Y.Mane | 56 |
| 19. | Scientific Revolution and Wome | Dr. Sheikh R. R. | 58 |
| 20. | Gender Inequality:Women's Empowerment & it's Facts of Women's Health&Nutrition, Educational Performance & Economic Status | Mr. Bhagwan S. Manal, | 60 |
| 21. | कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा २००५ आणि स्त्रिया | डॉ. सोंडगे ता.प. | 64 |
| 22. | महिला चळवळ आणि स्त्रिया | प्रा.डॉ. बिरादार प्रतिभा रंगराव | 67 |
| 23. | महिला सबलीकरण संकल्पनात्मक चौकट | डॉ.सुधीर आ. येवले | 69 |
| 24. | हुंडा प्रथा, समाज आणि स्त्रिया | डॉ. व्हि. व्हि. जाधव | 72 |
| 25. | जागतिकीकरण आणि स्त्रिया | डॉ. दिलीप सिताराम मस्के | 74 |
| 26. | कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. प्रदीप दाजीबा पाटील | 76 |
| 27. | नारी के स्वतंत्र और मौलिक व्यक्तित्व की तलाश 'आपका बंटी' | प्रा. डॉ. आहेर संगिता एकनाथराव | 79 |
| 28. | स्त्रियांचे मानवअधिकार : वास्तव की मिथ्या | प्रा. गीता एस. गिरवलकर | 81 |
| 29. | जागतिकीकरण आणि स्त्रिया | प्रा.गोरे अशोक रामचंद्र | 83 |
| 30. | महिला सक्षमीकरण आव्हाने आणि उपाय | प्रा. डॉ. घायाळ एस. पी. | 85 |
| 31. | सामाजिक सुधारणेच्या चळवळी आणि स्त्रीया | प्रा.डॉ. बानायत गांधी | 87 |
| 32. | महिला सुरक्षा विषयक कायदयाचा अभ्यास | प्रा. पोपळघट आर. एस. | 89 |
| 33. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा. डॉ. श्रीकांत गायकवाड | 92 |
| 34. | कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया | डॉ. सुनिल जाधव , प्रा.भोसले ए.आर. | 95 |
| 35. | हुंडा प्रथा समाज आणि स्त्रिया | प्रा.भैयासाहेब धोंडिबा मसुरे | 97 |

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue -92 , महिला सबलीकरणच्या समस्या : आव्हाने आणि उपाय | January 2019 | UGC Approved No. 40705

# जागतिकीकरण आणि स्त्रिया

प्रा.गोरे अशोक रामचंद्र
समाजशास्त्र विभाग प्रमुख, व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

**प्रस्तावना :-**

२० व्या शतकाच्या अखेरच्या कालखंडात जागतिकीकरण या संकल्पनेचा उदय झाला. आज जगातील अनेक देशांवर व अनेक घटकांवर जागतिकीकरणचा प्रभाव स्पष्टपणे जाणवत आहे. वर्तमान काळात जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान होताना दिसत आहे. जागतिकीकरण ही एक व्यापक प्रक्रिया आहे. वास्तविक पाहता जागतिकीरण ही विशुध्द स्वरूपातील आर्थिक संज्ञा आहे. व्यक्ती, समूह आणि समाजाच्या गरजा, इच्छा, भावना या सर्व बाबींना जागतिकीकरण प्रभावित करीत असलेले स्पष्टपणे जाणवत आहे. सर्व जगाची एक बाजारपेठ निर्माण करण्याचे योजनावध्द धोरण आणि प्रयत्न म्हणजे जागतिकीकरण.

जागतिकीकरण आर्थिक संज्ञेशी संबंधित असले तरी त्याचे प्रभावक्षेत्र अत्यंत व्यापक आणि सखोल आहे. जागतिकीकरण, नागरिकरण, सांस्कृतिक संमिलन, सांस्कृतिक पश्चायन, जीवन विषयक मूल्ये, जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन, औद्योगिकरण, तंत्रज्ञान, शिक्षण, आरोग्य, विज्ञान, व्यापार, राजकारण संस्कती, गुन्हेगारी, उपेक्षित घटक, स्त्रिया, धर्म, सामाजिक स्तरिकरण इत्यादी घटकांना जबरदस्त प्रभावित करीत आहे.

**जागतिकीकरणाचा अर्थ :-**

१) के.एन.पण्णीकर :- 'आर्थिक संदर्भात जागतिकीकरण ही एक प्रभावी प्रक्रिया आहे.'
२) 'जागतिकीकरण म्हणजे नवउदारमतवादी, नव साम्राज्यवादी विचारसरणीने घेतलेला आक्रमक पवित्रा होय.'
३) 'जागतिकीकरण हे आपली अर्थव्यवस्था जगाच्या अर्थव्यवस्थेशी जोडण्याचे धोरण आहे.'
४) 'जागतिकीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेवरील सरकारची बंधने शिथील करणे होय.'
५) 'जागतिकीकरण केवळ आर्थिक जीवनाशी संबंधित नाही तर जागतिकीकरणचा संबंध सामाजिक आणि सांस्कतिक जीवनाशी आहे.'
६) श्रावणकुमार सिंग :- 'जगातील सर्व राष्ट्राची एकच बाजारपेठ निर्माण करणे व त्यात जगातील साधन सामग्रीचे आणि भांडवलाचे सहजतेने परिचलन निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय.'

जागतिकीकरणाचे समर्थन करणारांना जग एक वैश्विक खेडे (Global Village) निर्माण करायचे आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मिळणाऱ्या लाभामध्ये कमी जणांचा वाटा आहे. मानवाची सुस्थिती, आर्थिक संपन्नता व समानता, आर्थिक व व्यवसायिक स्वातंत्र्यात वाढ आणि लोकशाहीचा विकास या परिप्रेक्ष्यात जागतिकीरणाची प्रक्रिया समजून घेणे कठीण असले तरी आवश्यक आहे. जागतिकीकरणाच्या व्यापक प्रक्रियेत स्त्रियांचे आणि विशेषतः भारतीय स्त्रियांचे स्थान काय आहे? हे अभ्यासणे हा या शोध निबंधाचा उद्देश आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :-**

१) जागतिकीकरणाची प्रक्रिया लक्षात घेणे.
२) भारतीय स्त्रियांची सद्यःस्थिती लक्षात घेणे.
३) जागतिकीकरणाचा भारतीय स्त्रियांवरील प्रभाव लक्षात घेणे.

**संशोधन :-**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केला असून संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट इ.चा आधार घेतला आहे.

**गृहितके : -**

१) जागतिकीकरण ही बहुआयामी प्रक्रिया आहे.
२) जागतिकीकरणाच्या प्रभावाने सामाजिक जीवन व्यापल आहे.
३) जागतिकीरणाचे चांगले आणि वाईट परिणाम होत आहेत.
४) स्त्रियांच्या विकासात जागतिकीकरण महत्वाची भूमिका पार पाडताना दिसत आहे.
५) जागतिक तंत्रज्ञानाचा फायदा आणि विविध व्यवसायांची उपलब्धता यामुळे स्त्रियांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळत आहे.
६) जागतिक पातळीवर स्त्रियांच्या क्षमता, कर्तृत्व आणि निर्णय क्षमतेला महत्व येत आहे.

**विषय विश्लेषण :-**

थौरान थरबॉन यांच्या मते जागतिकीरणाच्या अनेक लाटा असतात. जेंव्हा एखादा शोध, विचार, बदल त्या त्या देशाच्या सिमा ओलांडून अन्य देशांमध्ये आणि नंतर जगभर पसरतो व त्याचे चांगले आणि वाईट दीर्घकाळ परिणाम होतात या प्रक्रियेला जागतिकीकरण असे म्हटले जाते. भारतात इ.स.१९९० नंतर जागतिकीकरणाला चालना मिळाली. १९९० नंतर खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या संकल्पनांना विशेष महत्व प्राप्त झाले.

वस्तू, सेवा, श्रम, तंत्रज्ञान इ.गोष्टींचा देशाच्या सीमेबाहेर मुक्त संचार सुरू झाला. जागतिकीकरणामुळे महिलांच्या श्रमाला आंतरराष्ट्रीय पातळीवर मागणी वाढली. भारतीय श्रमीक महिला प्रामुख्याने असंघटीत क्षेत्रात काम करतात. अशा महिलांवर जागतिकीरणाचा मोठा परिणाम झालेला दिसून येतो. जागतिकीकरणाचा महिलांवरील प्रभाव समजून घेण्यापूर्वी काही ठळक घटना लक्षात घेणे आवश्यक आहे.

- १९५० मध्ये भारताने प्रजासत्ताक राज्यपध्दतीचा स्वीकार केला. समाजात स्त्री-पुरूषांमध्ये असणारी दरी घटनात्मक तरतुदींनी नाहीशी करण्याचा प्रयत्न झाला. मतदान, समान शिक्षण, सेवा मूलभत हक्क या दृष्टीने प्रत्येकाला सारखे अधिकार घटनेने दिले.
- १९६१ मध्ये हुंडा विरोधी कायदा संमत झाला.
- १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर झाले.
- ०८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिवस पाळावा, असे आवाहन संयुक्त राष्ट्र संघटनेने केले.
- १९७५ नंतर भारतात स्त्री-मुक्ती संघटनांचे कार्य वाढले.
- १९९० नंतर स्त्री अभ्यास केंद्रांना चालना मिळाली.
- १९९० मध्ये केंद्राने 'स्त्री' आयोगाची स्थापना केली.
- १९९० मध्ये सरकारने महिलांसाठी ३० टक्के आरक्षण राजकारणात जाहीर केले.
- १९९० हे वर्ष आंतरराष्ट्रीय बालिका वर्ष म्हणून घोषत झाले.
- २००६ मध्ये कौटुंबिक छळातून स्त्रियांची सुटका करणारा नविन कायदा पास झाला.
- १९९० नंतर स्त्रीवादी नियतकालिकांना चालना मिळाली व स्त्रियांना व्यक्त होण्याचे व्यासपीठ प्राप्त झाले.

वरील सर्व घटना जागतिकीकरणाने प्रभावित आणि जागतिकीकरणाला चालना देणाऱ्या होत्या. या घटनांमुळे भारतीय स्त्रियांच्या जीवनात काही बदल झाले. १९९० नंतर भारतात खऱ्या अर्थाने जागतिकीकरणाला चालना मिळाली. जागतिकीकरणामुळे भारतीय महिलांच्या संदर्भात खालील बदल झाले.

- स्त्रियांचा उच्च शिक्षणात सहभाग वाढला.
- घटस्फोट, वारसाहक्क, सन्मानाची वागणूक याबाबत जागृती
- कुटुंब नियोजन, बालविवाह बंदी, स्त्री पुर्नविवाहास चालना
- स्त्रिया आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत.
- निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग वाढत आहे.
- विविध तांत्रिक शोधांमुळे स्त्रियांचे श्रम कमी होत आहेत.
- नवीन व्यवसाय, नोकरीच्या संधी उपलब्ध होत आहेत.
- स्त्रियांच्या आंतरराष्ट्रीय स्थलांतराला चालना मिळत आहे.
- स्त्रियांच्या विज्ञानवादी दृष्टिकोनात वाढ होत आहे.
- स्त्रियांच्या व्यक्तिगत उत्पन्नात वाढ होत आहे.
- जागतिकीकरणामुळे असमानतेत वाढ होत आहे.
- स्त्रियांवरील मानसिक दबाव वाढत आहे.

**निष्कर्ष :-**

१) भारतात जागतिकीकरणाचा प्रभाव वाढत आहे.
२) जागतिकीकरणाचे चांगले आणि वाईट परिणाम स्त्रियांवर होताना दिसत आहेत.
३) जागतिकीकरणाची भारतात संक्रमण अवस्था आहे.

**संदर्भ :-**

१) 'स्त्री-विकासाचे नवे क्षितिज' - संपादक डॉ.स्वाती कर्वे
२) 'स्त्री-संघर्षाची नवी रुपे' – नंदिता गांधी, नंदिता शाह
३) 'भारतातील महिला विकासाची वाटचाल'- ज.शं.आपटे, पुष्पा रोडे
४) 'जागतिकीकरणाचे सामाजिक परिणाम'-श्रुती तंबे
५) 'दै.दिव्य मराठी' सोलापूर आवृत्ती, कविता महाजन यांचा लेख, दि.२५/१२/२०१८

# Interdisciplinary International Conference contemporary Issues & Challenges in Social Sciences & Languages

22nd Sept.2018

## Organizer

**Deparitment of Political Science,**

**Shri Sahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur**

## Special Issue published By

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

**ISSN 2349-638x**

**Peer Review and Indexed Journal**

**Impact Factor 4.574**

**Website www.aiirjournal.com**

**Email :- aiirjpramod@gmail.com**

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 122 | डि .के,डाके | कामगार चळवळींपुढील आव्हाने | 423 To 425 |
| 123 | ज्ञानेश्वर बनसोडे | दहशतवाद : समकालीन जगाची समस्या | 426 To 427 |
| 124 | डॉ. दत्तात्रय सौदागर सावंत | भारतीय परराष्ट्र धोरणात पंडीत नेहरूंचे योगदान | 428 To 430 |
| 125 | डॉ. एस. डी. पवार | येमेन राष्ट्रामधील सत्तासंघर्ष | 431 To 433 |
| 126 | **डॉ. विजय जालिंदर देठे** | **भारतीय लोकशाहीसमारील नक्षलवादाचे आव्हान** | 434 To 438 |
| 127 | गजानन विठ्ठल बोधले | स्त्री भृणहत्या : एक आव्हान | 439 To 442 |
| 128 | गंगाधर बालू चव्हाण | सामाजिक समस्या व आव्हाने | 443 To 446 |
| 129 | डॉ. आर. डी. गंगथडे | प्राचीन मराठवाड्यातील प्रमुख व्यापारी मार्ग | 447 To 449 |
| 130 | अशोक रामचंद्र गोरे | भारतातील कौटुंबिक हिंसा – समाजशास्त्रीय अभ्यास | 450 To 451 |
| 131 | महादेव माणिकराव हारगे | 'प्रांतवाद' भारतीय राजकारणसासमोरील एक समस्या | 452 To 454 |
| 132 | डॉ. काशिनाथ रामचंद्र तनंगे | महाराष्ट्रातील साखर कारखान्यांचा विकास सद्यस्थिती आणि आव्हाने | 455 To 460 |
| 133 | किरण नामदेव गायकवाड | महाराष्ट्रातील राजकरणात जाती अस्मीतेचे आव्हान | 461 To 462 |
| 134 | डॉ. संतोष सुधाकरराव कोटुरवार | सामाजिक शास्त्रासमोरील आव्हाने व सद:स्थिती | 463 To 464 |
| 135 | डॉ. चंद्रकांत कुरणे | विमलाताई बागल आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर | 465 To 466 |

# भारतातील कौटुंबिक हिंसा – समाजशास्त्रीय अभ्यास

प्रा.अशोक रामचंद्र गोरे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

**प्रास्ताविक :-**

भारतातील कौटुंबिक हिंसाचाराचे वाढते प्रमाण लक्षात घेता आणि हिंसाचाराला बळी पडणाऱ्या स्त्रियांची मोठी संख्या लक्षात घेता, भारतीय संविधानाच्या कलम १४ अन्वये महिलांना भेदभावापासून मुक्ती, कलम १५ अन्वये स्त्री-पुरूष समानता आणि कलम २१ अन्वये जीविताचे व स्वातंत्र्याचे संरक्षण व्हावे, हा व्यापक हेतू डोळ्यासमोर ठेवून महिलांनी कौटुंबिक अत्याचाराला बळी पडू नये म्हणून केंद्र शासनाने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ व नियम २००६ संपूर्ण भारतात २६ ऑक्टोबर २००६ पासून लागू केला आहे.

कौटुंबिक हिंसाचार कायदा अस्तित्वात आल्यानंतर कायदे महिलांच्या बाजूने आहेत, अशी ओरड झाली. परंतू नंतर ही ओरड हळू हळू कमी झाली. कौटुंबिक हिंसाचारात स्त्रिया मोठ्या संख्येने बळी पडतात. भारतात दरवर्षी १२ ते १५ हजार विवाहिता हुंड्याच्या बळी ठरतात. हुंडाबळीचे सर्वाधिक प्रमाण उत्तर भारत, आंध्रप्रदेश, हरियाणा, महाराष्ट्र, ओरिसा व राजस्थान या राज्यात आढळते.

**कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय?**

कौटुंबिक हिंसाचारामध्ये शारीरिक, शाब्दिक, लैंगिक, मानसिक किंवा आर्थिक छळ, हुंडा किंवा मालमत्ता देण्यासाठी महिलेला अपमानित करणे, तिला शिवीगाळ करणे, अपत्य नसल्यामुळे तिला हिणवणे, धमकावणे, त्रास देणे, दुखापत करणे, जखमी करणे किंवा पीडित स्त्रीचा जीव धोक्यात आणण्यास भाग पाडणे, स्त्रीच्या कोणत्याही नातेवाईकाकडे हुंड्याची मागणी करणे, महिलांचे स्वतःचे उत्पन्न, स्त्रीधन मालमत्ता किंवा इतर आर्थिक व्यवहार किंवा तिच्या हक्काच्या कोणत्याही मालमत्तेपासून तिला वंचित करणे, घराबाहेर काढणे इत्यादींचा समावेश होतो.

**शोध निबंधाचे उद्देश :-**

१) कौटुंबिक हिंसाचार संकल्पना समजून घेणे.
२) कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरुप लक्षात घेणे.
३) कौटुंबिक हिंसाचाराचे महिलांवरील परिणाम लक्षात घेणे.
४) कौटुंबिक हिंसाचारा संदर्भात भारतीय काद्याची ओळख करून घेणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंध लिहिताना तथ्यांच्या दुय्यम स्त्रोतांचा आधार घेतला आहे. संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्र इ.चा आधार घेण्यात आला आहे.

**गृहितके :-**

१) कौटुंबिक हिंसाचार ही संकल्पना अत्यंत व्यापक आहे.
२) भारतात कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमाण जास्त आहे.
३) कौटुंबिक हिंसाचारात बळी पडणाऱ्या स्त्रियांची संख्या जास्त आहे.
४) कौटुंबिक हिंसाचारात कमी प्रमाणात पुरूष बळी पडतात.
५) कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमाण कमी करण्यास कायदा सक्षम आहे.
६) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याचा काही प्रमाणात गैरवापर होत आहे.

विषय विश्लेषण :-

भारतात कौटुंबिक हिंसेमध्ये प्रामुख्याने हुंड्याशी संबंधित मारहाण किंवा मृत्यू (हुंडाबळी), पत्नीला मारहाण किंवा हत्या, लैंगिक अत्याचार, विधवा स्त्रियांवरील अत्याचार, वृध्द महिलांवरील अत्याचार या घटना प्रामुख्याने घडत असतात.

भारत सरकारच्या मे २००० च्या अहवालानुसार भारतात प्रत्येक ९० मिनिटांत सरासरी हुंड्याशी संबंधित १ हत्या होते. एका दिवसात सरासरी १६ तर वर्षात जवळपास ६००० पेक्षा जास्त हत्या हुंड्याशी संबंधित होत असतात. विशेषतः मध्यमवर्गीय स्त्रियांचे प्रमाण कनिष्ठ वर्गीय स्त्रियांपेक्षा जास्त आहे. जवळपास ७० टक्के पीडित स्त्रिया २१-२४ या वयोगटातील असतात. कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातींपेक्षा उच्च जातींमध्ये ही समस्या जास्त आहे.

कौटुंबिक हिंसेमध्ये हुंडाबळी प्रमाणेच पत्नीला मारहाण हा घटक देखील महत्वपूर्ण आहे. हिंसक मारहाण, तोंडात मारणे, चावणे, यातना देणे, मारूण टाकणे या सारख्या घटनांचा समावेश होतो. पत्नीला मारहाण होण्याच्या विविध कारणांमध्ये प्रामुख्याने व्यसनाधिनता (नशा), पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेणे, हुंडा किंवा आर्थिक अपेक्षा, गैरसमज, पत्नीचे आक्षेपार्ह वर्तन, पत्नी पसंत नसणे, कुटुंबातील अन्य सदयांची गैरमर्जी इत्यादी कारणांचा समावेश होतो. भारतीय समाजातील कुटुंबात विधवा स्त्रिया, लहान मुले आणि वृध्द स्त्रियांच्या संदर्भात होणाऱ्या हिंसेच्या घटना हा देखील चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे.

**कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत तरतुदी :-**

- कलम १४-संयुक्त समुपदेशन/समझोते या कायद्याच्या अंतर्गत उपलब्ध आहे.
- कलम १८ – कोणत्याही प्रकारची घरगुती हिंसा न करणे, कामाच्या ठिकाणी प्रवेश न करणे, संपत्ती न विकणे.
- कलम १९ – स्त्रियांना घराबाहेर काढणे किंवा त्यांना घरातं राहण्यास अडथळा आणणे.
- कलम २० – पोटगीचे आर्थिक संरक्षण-राहणीमानाच्या दृष्टिने पुरेशी उचित, योग्य आर्थिक रक्कम देणे.
- कलम २१ – मुलांच्या ताब्याचे संरक्षण
- कलम २२ – पिडीत व्यक्तीला झालेली इजा, मानसिक छळ व भावनिक क्लेश यासाठी नुकसान भरपाई देणे.

२००१ च्या आकडेवारीनुसार भारतात पतीकडून छळाचे ९९१३५ प्रकरणे उघडकीस आली आहेत. यावरून ही समस्या किती गंभीर स्वरुपाची आहे हे लक्षात येते.

**निष्कर्ष :-**

१) कौटुंबिक हिंसाचार ही एक सर्वव्यापी सामाजिक समस्या आहे.
२) कौटुंबिक हिंसाचाराचे परिणाम समाजावर होत आहेत.
३) भारतात कौटुंबिक हिंसाचारात सर्वाधिक बळी स्त्रिया आहेत.
४) आधुनिक समाजात कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप बदलत आहे.

**संदर्भ सूची :-**

१) 'भारतातील सामाजिक समस्या'- प्रा.पी.के.कुलकर्णी
२) 'भारतीय सामाजिक समस्या' – प्रा.अशोक गोरे
३) 'आधुनिकता और भारतीय समाज' – डॉ.अंजू शुक्ला